दुरध्वनी क्र. 022 25421373
25434349
इमेल - dcfthane@gmail.com
dycftahne@mahaforest.gov.in

महाराष्ट्र शासन
वनविभाग

# उप वनसंरक्षक ठाणे वनविभाग ठाणे यांचे कार्यालय

मॅरेथॉन सर्कल,लाल बहादुर शास्त्री मार्ग नौपाडा ठाणे - 400 602

पत्र जा.क्र.कक्ष -25/ब/मोजणी/एफसीए/ 4155 /2024-25 दिनांक - 04 /12/2024

प्रति,

श्री. निखील बी. खरवंदीकर,
उप महाप्रबंधक (बांधकाम)
गेल इंडिया लि. 100 राणा हाऊस,
3 रा मजला, रामदास पेठ,
नागपूर - 440 010.

**विषय** - Re-Diversion of 18.1150 Ha. Forest land for laying of Natural Gas Pipeline from Mumbai to Nagpur through Thane, Nashik, Ahmednagar, Aurangabad, Jalna, Buldhana, Washim, Amravati, Wardha, & Nagpur District in the State of Maharashtra.

**संदर्भ** -
1. केंद्र शासन पत्र क्र. FC-II/MH-192/2022-NGP/10561 दि. 04/11/2022.
2. केंद्र शासन पत्र क्र. FC-II/MH-198/2022-NGP/11152 दि. 06/02/2023.
3. आपलेकडील पत्र क्र. GAIL/MNPL/FOREST/THA/002 दि. 30/05/202.
4. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-25/ब/मोजणी/एफसीए/3809 दि. 27/10/2023.
5. वनक्षेत्रपाल, कल्याण यांचेकडील पत्र क्र. मोजणी/एफसीए/667 दि. 31/08/2023.
6. सहाय्यक वनसंरक्षक (र.रा.प.व वजी), ठाणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-1/मोजणी/368 दि. 20/09/2023.
7. वनक्षेत्रपाल, कल्याण यांचेकडील पत्र क्र. मोजणी/एफसीए/1006 दि. 18/12/2023.
8. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-25/ब/मोजणी/एफसीए/4948 दि. 21/12/2023.
9. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-25/अ/मोजणी/एफसीए/1804 दि. 15/01/2024.
10. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.50/13-14/585 दि. 28/02/2024.
11. दि. 01/03/2024 रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे दालनात झालेली चर्चा.

ठाणे वनविभागातील मुंबई - नागपूर 24" गॅस पाईपलाईन करीता समृध्दी एक्सप्रेस वे व दहेज - उरण पाईपलाईन प्रस्तावातील 18.1150 हे. (ठाणे वनविभाग 1.2728 हे.) वनक्षेत्र पुर्नवळतेकरण करण्याकरीताच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडील उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये तत्वत: मान्यता व संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे.

केंद्र शासनाकडील अंतिम मंजूरी पत्रातील **अट क्र. v** नुसार प्रकल्प प्राधिकरणाने 25000 विविध प्रजातींची रोपे जसे, बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्थानिक प्रजातीची रोपे तयार करून त्यातील 50 % रोपे प्रकल्पातील प्रस्तावित वनक्षेत्राभोवती लागवड करावी आणि उर्वरित 50 % रोपे लागवडीसाठी स्थानिकांना 10 वर्ष मोफत वाटप करणेबाबत आहे. तसेच संबंधित संयुक्त वन व्यवस्थापन

समितीने रोपे लागवडीचा व रोपे वाटपाचा अभिलेख जतन करून ठेवावा असे नमुद आहे. यासंदर्भात आपलेकडील संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये ठाणे वनविभागातील बाधित होणारे 1.2728 हे. क्षेत्राकरीता 1757 रोपे तयार करणे व लागवडीसाठी 10 वर्षाकरीता आवश्यक रक्कम कळविण्याची विनंती केली आहे.

प्रस्तावांतर्गत प्रस्तावित क्षेत्राच्या गुणोत्तरानुसार ठाणे वनविभागाकरीता 1757 रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीका व रोपे लागवडीसाठी 10 वर्षाची योजना तयार करून आवश्यक रक्कमेची अंदाजपत्रक सादर करण्यास या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये वनक्षेत्रपाल, कल्याण यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 5 अन्वये वनक्षेत्रपाल, कल्याण यांनी सहाय्यक वनसंरक्षक (र.रा.प.व वजी), ठाणे यांचेमार्फत प्रकल्पातील प्रस्तावित वनक्षेत्राभोवती 50 % व स्थानिक लोकांना मोफत वाटण्याकरीता 50 % असे एकूण 1757 रोपे तयार करणे व लागवड करणेकामी 10 वर्षाकरीता **एकूण रु. 1138244 /-** एवढया रक्कमेची अंदाजपत्रके सादर केली आहेत. तसेच सदरील अंदाजपत्रकीय रक्कमेचा भरणा संयुक्त वनव्यस्थापन समिती, म्हसकळ (Sanyukta Vanvyavsthapan Samiti, Mhaskal) या समितीकडे वर्ग करण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. 7 अन्वये वनक्षेत्रपाल, कल्याण यांनी कळविले आहे.

त्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. 8 अन्वये केंद्र शासनाकडील अंतिम मंजूरी पत्रातील **अट क्र. v** नुसार प्रस्तावांतर्गत प्रस्तावित क्षेत्राच्या गुणोत्तरानुसार ठाणे वनविभागाकरीता 1757 रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीका व 10 वर्षासाठी 50 % रोपे लागवडीकरीता एकूण आवश्यक रक्कम **रु.** 1138244 /- चा भरणा **Sanyukta Vanvyavsthapan Samiti, Mhaskal** यांचे नावे **धनाकर्ष** (Demand Draft) व्दारे जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तसेच या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 9 अन्वये वन संवर्धन अधिनियम, 1980 अंतर्गत विविध प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या तत्वत: मंजूरी व अंतिम मान्यता पत्रामध्ये राष्ट्रीय वन नीती / वृक्ष आच्छादन सुधारणे आणि राज्यतील प्रदूषण कमी करणेकामी वन धोरण, 1988 आणि पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 नुसार संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या (JFMC's) सहभागाने स्थानिक वनप्रजाती, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत वनस्पती इत्यादी रोपे तयार करून त्यापैकी 50 % रोपे स्थानिक लोकांना लागवडीकरीता मोफत देवून व उर्वरित 50 % रोपे JFMC's अंतर्गत वळतेकरण होणाऱ्या क्षेत्राच्या परिसरामध्ये लागवड करण्याबाबतच्या अटीचा समावेश असल्याने सदर अटीकरीता आवश्यक रक्कमेचा भरणा कोणत्या खात्यामध्ये जमा करून घेण्यात यावी याबाबत मुख्य. वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचेमार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपूर यांचेकडून मार्गदर्शन मिळणेकामी प्रचलन होणेस विनंती करण्यात आली होती.

त्यावर उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 10 अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांनी वन (संरक्षण एवम संवर्धन) नियम, 2023 दि. 29/12/2023 रोजीच्या Handbook मधील Chapter 1 परिच्छेद क्र. 1.5 मधील तरतुदीनुसार दि. 01/03/2024 रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार सदर अटीनुसार आवश्यक रक्कमेचा भरणा Ad Hoc CAMPA च्या खात्यामध्ये भरणा करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाकडील अंतिम मंजूरी पत्रातील **अट क्र. v** नुसार प्रस्तावांतर्गत प्रस्तावित क्षेत्राच्या गुणोत्तरानुसार ठाणे वनविभागाकरीता 1757 रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीका व 10 वर्षासाठी 50 % रोपे लागवडीकरीता एकूण आवश्यक रक्कम **रु.** 1138244 /- चा भरणा **Sanyukta Vanvyavsthapan Samiti, Mhaskal** यांचे नावे **धनाकर्ष** (Demand Draft) जमा करण्यात

आला आहे किंवा कसे ? तसेच सदरील रक्कम **Sanyukta Vanvyavsthapan Samiti, Mhaskal** यांचे नावे भरणा करण्यात आली असल्यास त्याबाबतचे Bank Details, Aknowldegemnt, Challan Etc. या कार्यालयास सादर करावे.

तसेच सदरील रक्कम अद्याप भरणा करण्यात आली नसल्यास उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 10 व 11 चे निर्देशानुसार **Ad Hoc CAMPA** चे खात्यामध्ये भरणा करण्यात यावी व तसे या कार्यालयास अवगत करण्यात यावे. जेणे करून प्रस्तावाबाबतचे पुढील संस्करण करणे सोईचे होईल.

(सचिन रेपाळ, भा.व.से.)
**उप वनसंरक्षक**
**ठाणे वनविभाग ठाणे**

**प्रतिलीपी -** मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.